कृत्रिम पावसाच्या प्रयोगावर देखरेख ठेवण्यासाठी
संचालन आणि सुकाणू समितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०१९/प्र.क्र.१३१/आव्यप्र-१
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २६ जुलै, २०१९

प्रस्तावना :-

राज्याच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक २८.५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सन २०१९ च्या मान्सून कालावधीत राज्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. कृत्रिम पावसाच्या प्रयोगावर देखरेख ठेवण्यासाठी संचालन आणि सुकाणू समिती असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९ मान्सून कालावधीत राज्यात करण्यात येणाऱ्या कृत्रिम पावसाच्या प्रयोगावर देखरेख ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे संचालन आणि सुकाणू समितीची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

श्री. किशोर राजे निंबाळकर, सचिव (आपत्ती व्यवस्थापन ,मदत व पुनर्वसन), मंत्रालय मुंबई	अध्यक्ष
श्री. अभय यावलकर, संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई	सदस्य
श्री. सुहास दिवसे,कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेंट्रल बिल्डींग, पुणे-१.	सदस्य
श्री.के.एल.होसाळीकर, उप महासंचालक, भारतीय हवामान विभाग, कुलाबा, मुंबई	सदस्य
श्री. सुभाष उमराणीकर, उप सचिव (मदत),आपत्ती व्यवस्थापन ,मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
श्रीमती. राजश्री राऊत, वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मुंबई	सदस्य
श्रीमती थारा,इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी, पुणे	सदस्य
डॉ.जे.आर.कुलकर्णी, सेवानिवृत्त हवामान शास्त्रज्ञ, पुणे	सदस्य
डॉ.रामचंद्र साबळे, कृषी विद्या, कृषी हवामान शास्त्रज्ञ, ५२७, नारायण पेठ, पुणे	सदस्य
श्री. श्रीरंग घोलप, अवर सचिव (आव्यप्र-१) आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय, मुंबई	सदस्य

समितीने पुढील ३ महिन्याकरिता कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यासाठीची रुपरेषा तयार करावी.

समितीने कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यासाठीची कार्यपध्दती निश्चित करुन पडलेल्या पावसाचे योग्य मोजमाप करण्यासाठी उपाययोजना सुचवाव्यात.

समितीने कृत्रिम पावसाच्या प्रयोगावर योग्यती देखरेख ठेवून प्रयोगाच्या कालावधीत दररोज करण्यात आलेली कार्यवाही आणि त्यापासून मिळालेले यश याबाबतचा अहवाल वेळोवेळी आपत्ती व्यवस्थापन प्रभागास सादर करावा.

समितीकडून प्राप्त होणाऱ्या अहवालाचे योग्य संकलन करुन आपत्ती व्यवस्थापन प्रभागाने राज्य मंत्रीमंडळास त्याबाबत अवगत करावे.

समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या अशासकीय सदस्यांना प्रवासभत्ता / वाहनव्यवस्था उपलब्ध करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र २०१९०७२६१३५७३५३२१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.07.26 14:06:57 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. उप महासंचालक, भारतीय हवामान खाते, मुंबई
४. उप सचिव (मदत),आपत्ती व्यवस्थापन ,मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (म.व पु.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
७. संचालक (आव्यप्र) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. आव्यप्र-१, संग्रहार्थ